06-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/5/2025 9:51 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

सोनसोडो डंप यार्ड होणार 'ग्रीन झोन' पान ३ वर

बेंगळुरू चेंगराचेंगरी : बीसीसीआयने जबाबदारी नाकारली पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ६ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 274 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 6 June 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

राफेलची बॉडी तयार होणार भारतात

नवी दिल्ली, दि. ५ : एक मोठी वार्ता समोर येत आहे. संरक्षण क्षेत्रात विविध प्रयोग सुरू आहे. आता राफेल फायटर जेटविषयी महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. राफेल लढाऊ विमानाची बॉडी पहिल्यांदा फ्रान्सबाहेर, भारतात तयार होणार आहे. टाटा डव्हान्स्ड सिस्टिम आणि डसॉल्ट एव्हिएशनने भारतात राफेल लढाऊ विमानाची बॉडी तयार करण्यासाठी चार करारावर स्वाक्षरी केली आहे. पहिल्यांदाच या लढाऊ विमानाच्या बॉडी उत्पादनाची जबाबदारी फ्रान्सबाहेर सोपविण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. भारताने केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे कंबरडे मोडले. त्याचदरम्यान राफेल फायटर जेटची मोठी चर्चा झाली. भारतीय वायुदलाच्या ताफ्यातील राफेलने सीमा पार करून पाकिस्तानला दिवसा तारे दाखवले. आता राफेलची बॉडी भारतात तयार होण्याची बातमी समोर आली आहे. राफेल तयार करणारी कंपनी द सॉल्ट एव्हिएशनने एक मोठा निर्णय घेतला आहे. दसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा समूह मिळून भारतात राफेल फायटर जेटची बॉडी तयार करणार आहे. त्यासाठी या दोन्ही कंपन्यांमध्ये ४ उत्पादनाविषयीच्या हस्तांतरण करारावर स्वाक्षर्‍या झाल्या आहेत.

दसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा समूहामध्ये करण्यात आलेला करार ऐतिहासिक मानण्यात येत आहे. फ्रान्सच्या बाहेर पहिल्यांदाच या फायटर जेटचे पार्टस बाहेर तयार होतील. दसॉल्ट एव्हिएशनचे चेयरमन आणि उएज म्हणाले की, पहिल्यांदाच राफेलच्या उत्पादन फ्रान्सबाहेर करण्यात येईल. भारतात आमची पुरवठा साखळी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.

पुतीन भडकले, युक्रेन बेचिराख होणार ?

मॉस्को, दि. ५ : गेल्या काही दिवसांपासून युक्रेन आणि रशिया यांच्यातील संघर्ष वाढला आहे. या दोन्ही देशांतील युद्धाने सध्या भीषण रुप धारण केलं आहे. युक्रेनने शोकडे ड्रोनच्या माध्यमातून रसियामध्ये घुसून हल्ले केले आहेत. विशेष म्हणजे या हल्ल्यात रशियाची एकूण ४१ विमानं ध्वस्त झाली आहेत. असे असतानाच आता युक्रेनच्या या हल्ल्याला रशियादेखील सडेतोड उत्तर देणार आहे. खुद्द रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीच तसे संकेत दिले आहेत. त्यामुळे आता युक्रेन-रशिया यांच्यातील युद्ध विकोपाला जाण्याची शक्यता आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुतीन यांनी नेमकं काय म्हटलंय याबाबत सांगितलं आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमीर पुतीन यांच्यात एका तासापेक्षा अधिक काळ फोनद्वारे चर्चा झाली. या चर्चेनंतर रशिया युक्रेनला जशास तसे उत्तर देणार आहे, अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या सोशल मीडिया मंचावर याबाबत माहिती दिली आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमीर पुतीन यांच्यात युक्रेनसोबतच्या युद्धावर चर्चा झाली. आमच्या दोघांत चांगली चर्चा झाली. मात्र आमच्या या चर्चेतून शांततेचा तोडगा लगेच निघणार नाही. युक्रेनने केलेल्या हल्ल्याला आम्ही चोख प्रत्युत्तर देणार, असे पुतीन यांनी ट्रम्प यांना स्पष्टपणे सांगितले आहे.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबावे यासाठी अमेरिकेकडून वेगवेगळे प्रयत्न केले जात आहेत.

सोन्याची झेप लाखाच्या पार

नवी दिल्ली, दि. ५ : जोरदार जागतिक मागणीमुळे भारतात सोन्याच्या दरात ४३० वाढ झाली असून दिल्लीत दर १० ग्रॅम ९९,६९० रुपयांवर पोहोचला आहे. त्याचबरोबर चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. चांदीचा दर प्रति किलो १,०४,१०० रुपयांवर पोहोचला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्या-चांदीच्या दरात वाढ झाली आहे. डॉलर कमजोर झाल्याने सोन्याला आधार मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुंबईत सोन्याच्या दराने १ लाखांचा टप्पा ओलांडला आहे. दर १ लाख ७२० रुपयांपर्यंत गेला आहे.

टॅक्सी अॅग्रीगेटर धोरण रद्द करण्याची आप'ची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड :

मडगाव, दि. ५: ट्रान्सपोर्ट अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५ च्या मसुद्याच्या पार्श्वभूमीवर गोव्यातील टॅक्सी चालकांनी आम आदमी पक्षाचे आमदार वेंझी व्हिएगस आणि क्रूझ सिल्वा यांची भेट घेतली. या चर्चेनंतर दोन्ही आमदारांनी टॅक्सी चालकांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला असून, २० मे रोजी जारी करण्यात आलेल्या राजपत्र अधिसूचनेची तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

आमदार व्हिएगस आणि सिल्वा यांनी आरोप केला की पारंपरिक टॅक्सी चालकांच्या मते विचारात न घेता हे नवे धोरण तयार करण्यात आले आहे. दशकानुदशके गोव्याच्या पर्यटन व्यवस्थेचा भाग असलेल्या स्थानिक टॅक्सी चालकांशी सल्लामसलत न करता तयार करण्यात आलेली ही धोरणे अन्याय्य आहेत, असे आमदारांनी सांगितले. त्यांनी इशारा दिला की अॅग्रीगेटर आधारित प्रणाली लागू झाल्यास अनेक स्थानिक चालकांच्या उपजीविकेवर गदा येईल.

टॅक्सी चालकांकडील परवाने, दस्तऐवज आणि नोंदणीप्रमाणे ते अधिकृत व्यवसाय करत असल्याचे नमूद करत आमदारांनी सांगितले की, हे चालक अनेक वर्षांपासून नियमांनुसार व्यवसाय करत आहेत. त्यांना बाजूला सारून मोठ्या अॅप आधारित कंपन्यांना प्राथमिकता देणे अन्यायकारक ठरेल. त्यांच्या मते, सरकारने अशा धोरणांसाठी दरवाजे उघडण्याऐवजी स्थानिक चालकांचे हित जपणारी भूमिका घ्यायला हवी.

आप आमदारांनी स्पष्ट केले की, किनारपट्टी भागात अॅग्रीगेटर सेवा सुरू होण्याच्या वेळीच पक्षाने याला विरोध केला होता. नवीन धोरणामुळे उत्पन्नात घट होईल आणि अनियमित स्पर्धेला सामोरे जावे लागेल, याची आम्हाला जाणीव होती, असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की हा मुद्दा विधानसभेत उचलून धरला जाईल आणि सरकारदरबारी टॅक्सी चालकांचा आवाज पोहोचवला जाईल.

व्हिएगस आणि सिल्वा यांनी अन्य राज्यांतील उदाहरणांचा दाखला देताना म्हटले की, अॅप आधारित सेवा अनियंत्रितपणे वाढल्यामुळे पारंपरिक चालकांवर परिणाम झाला आहे आणि अनेकांचे रोजगार गेले आहेत. त्यांनी अशीही भीती व्यक्त केली की, गोव्यातही अशीच स्थिती उद्भवल्यास पर्यटन उद्योगावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

आमदारांनी यावर तोडगा म्हणून एका संयुक्त समितीच्या स्थापनेची मागणी केली. या समितीत सरकारी अधिकारी, टॅक्सी युनियनचे प्रतिनिधी आणि इतर संबंधित घटक सहभागी असावेत, जेणेकरून पारदर्शक आणि सर्वसमावेशक प्रक्रियेतून धोरणाचा फेरआढावा घेता येईल.

दोन्ही आमदारांनी टॅक्सी चालकांच्या आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेत त्यांच्या सोबत जमिनीवर उतरत पाठिंबा दर्शवला. त्यांनी पुन्हा एकदा अधिसूचना तात्काळ मागे घेण्याची मागणी करत, सल्लामसलत व संवादाअभावी लागू करण्यात आलेले धोरण हे संपूर्ण क्षेत्रात अस्थिरता निर्माण करू शकते, असा इशारा दिला.

स्थानिकांनी व्यक्त केली अॅप टॅक्सी सेवेची गरज

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : गोव्यातील अनेक स्थानिक रहिवाशांनी अॅप-आधारित टॅक्सी सेवा केवळ पर्यटकांसाठीच असल्याचा दावा खोडून काढत, त्या सेवा गोव्यातील नागरिकांसाठी देखील अत्यावश्यक असल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. ट्रान्सपोर्ट अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५ च्या प्रस्तावित मसुद्याला त्यांनी जोरदार पाठिंबा दर्शवला आहे.

काही टॅक्सी संघटनांकडून आणि राजकीय गटांकडून अॅप-आधारित टॅक्सी सेवा पर्यटकांसाठीच उपयुक्त असल्याचे सध्याचे विधान स्थानिकांनी फेटाळून लावले आहे. गोव्यात खाजगी वाहने असली तरीही, सार्वजनिक वाहतुकीच्या अपुऱ्या सुविधांमुळे आम्हाला सुसज्ज आणि परवडणाऱ्या पर्यायांची नितांत गरज आहे, असे कुंकळ्ळी येथील एका रहिवाशाने सांगितले. वाहन असणे ही आता चैनीची नव्हे, तर गरजेची गोष्ट बनली आहे. मात्र, त्याचा अर्थ असा नाही की आम्ही अॅपवरून टॅक्सी बुक करण्यास असमर्थ आहोत.

स्थानिकांनी सांगितले की, देशातील मोठ्या शहरांमध्ये जसे की मुंबई किंवा बेंगळुरू अॅप-आधारित टॅक्सी सुविधा ही केवळ पर्यटकांसाठीच नव्हे, तर स्थानिकांसाठी देखील अत्यंत उपयुक्त ठरतात. कार असली तरी लोक सहज आणि सुरक्षित प्रवासासाठी ओला, उबरचा पर्याय निवडतात. मग गोवा त्यापासून वंचित का? असा सवाल मडगावमधील एका खासगी कर्मचारी वर्गातील व्यक्तीने उपस्थित केला.

विशेषतः रात्रीच्या वेळेस सार्वजनिक वाहतुकीची सध्या अस्तित्वात असलेली अपुरी व्यवस्था आणि ग्रामीण भागांतील दुर्गमतेकडे स्थानिकांनी लक्ष वेधले. पणजी, मडगाव, मापसा आणि वास्कोच्या बाहेर रात्रीच्या वेळी घर गाठणे अवघडच ठरते, असे केपे येथील एका नोकरदार महिलेनं सांगितले. अशा वेळी अॅप-आधारित टॅक्सी हा सुरक्षित पर्याय ठरू शकतो.

सध्याच्या टॅक्सी दरांबाबतही स्थानिकांमध्ये नाराजी आहे. एकच प्रवास महागड्या दरात करावा लागतो, जे सरासरी नागरिकाला परवडणारे नाही. अॅपवरून मिळणाऱ्या टॅक्सीमुळे पारदर्शक दर, वेळेची खात्री आणि वापरात सुलभता मिळू शकते, असे वेर्णा येथील एका महाविद्यालयीन प्राध्यापकाने सांगितले. प्रत्येकजण गाडी चालवत नाही आणि छोट्या अंतरासाठी जास्तीचा खर्च पान २ ▶

गोवा ट्रान्सपोर्ट अॅग्रीगेटर धोरणाला उद्योग क्षेत्राचा पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : गोवा सरकारने तयार केलेल्या 'ट्रान्सपोर्ट अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५' या धोरण मसुद्याला राज्यातील विविध उद्योग संघटनांकडून ठोस पाठिंबा मिळत आहे. या धोरणामुळे अॅप-आधारित टॅक्सी सेवांची अंमलबजावणी पारदर्शक आणि सुसूत्र पद्धतीने होणार असल्याने औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येईल, असे स्पष्ट मत विविध संघटनांनी व्यक्त केले आहे.

वेर्णा इंडस्ट्रीज असोसिएशनचा ठाम पाठिंबा :

वेर्णा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष कल्पक अरवारे यांनी सांगितले की, राज्यातील मोठ्या औद्योगिक केंद्रांपैकी एक असलेल्या वेर्णा औद्योगिक वसाहतीत हजारो कामगार कार्यरत आहेत. अॅप-आधारित टॅक्सी सेवा नसल्यामुळे शिफ्टमध्ये काम करणारे कामगार, महिला कर्मचारी आणि दुर्गम भागांतून प्रवास करणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीमुळे ही समस्या दूर होईल.

अरवारे यांनी पुढे सांगितले की, ही धोरणे केवळ गतिशीलतेसाठी महत्त्वाची नाहीत, तर त्या स्थानिक टॅक्सी व्यवसायांचे हितही जपतात. आम्ही सरकारकडे याची वेळेत अंमलबजावणी करण्याची मागणी करत आहोत.

गोवा टेक्नॉलॉजी असोसिएशनचे धोरणाला समर्थन :

गोवा टेक्नॉलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष सुजीत शेट्टी यांनी या धोरणाचे स्वागत करत सांगितले की, राज्यात तंत्रज्ञान, आयटी आणि ईएसडीएम क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. त्यासाठी कार्यक्षम आणि डिजिटल तंत्रज्ञानाशी सुसंगत वाहतूक व्यवस्था अत्यावश्यक आहे. अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे ही व्यवसाय सातत्य आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने निर्णायक भूमिका बजावतील.

या तत्त्वांमुळे स्थानिक चालकांचे उत्पन्न सुरक्षित राहील, ग्राहकांना विश्वासार्ह सेवा मिळेल आणि एक समावेशक डिजिटल पर्यावरण तयार होईल, असेही ते म्हणाले.

हे धोरण स्थानिक चालकांना सरकारनिश्चित दरांवर प्राधान्य देते, ट्रान्सपोर्ट अॅग्रीगेटर धोरण पारदर्शकतेला चालना देते आणि विशेषतः महिला चालक व इलेक्ट्रिक वाहनांसाठी प्रोत्साहन योजना लागू करते. यामुळे सामाजिक समता आणि पर्यावरणपूरक विकासाला बळ मिळेल, असे साळगावकर यांनी स्पष्ट केले.

लघु उद्योग भारतीची भूमिका

लघु उद्योग भारती गोवा शाखेने या धोरणाला प्रगतिशील आणि काळानुरूप पाऊल ठरवत पाठिंबा दर्शवला आहे. संघटनेच्या अध्यक्षा पल्लवी साळगावकर म्हणाल्या की , एमएसएमई क्षेत्रातील उद्योजक, व्यापार व सेवा उद्योगांसाठी अचूक आणि वेळेवर वाहतूक सुविधा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अॅप-आधारित टॅक्सी सेवा हा त्यांच्या दैनंदिन व्यवसायाचा अविभाज्य भाग बनू शकतो.

साळगाव-पिळर्ण रस्ता जाणूनबुजून खराब ठेवला जात असल्याचा काँग्रेसचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ५ : साळगाव-पिळर्ण रस्ता मुद्दाम बेजबाबदारपणे दुर्लक्षित ठेवल्याचा आरोप करत काँग्रेसने गुरुवारी म्हापशातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात निदर्शने करत तीव्र निषेध व्यक्त केला. या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था असून त्यामुळे औद्योगिक वसाहतीतील उद्योगधंद्यांना तसेच पर्यटन व्यवसायांना मोठा फटका बसत असल्याचे काँग्रेसने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

उत्तर गोवा जिल्हा काँग्रेस अध्यक्ष वीरेंद्र शिरोडकर यांच्या नेतृत्वाखाली साळगाव काँग्रेस ब्लॉक समितीने विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यासाठी कार्यालयात जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना प्रवेश नाकारल्यामुळे कार्यकर्ते आणि पोलिस यांच्यात झटापट झाली. यावेळी शिरोडकर यांचा शर्टही फाटल्याचा आरोप करण्यात आला. आम्ही निवेदन देण्यासाठी आलो होतो. आम्ही दहशतवादी नाही. तरीही पोलिसांनी आमच्याशी असभ्य वर्तन केले, असे शिरोडकर यांनी सांगितले.

संबंधित रस्ता अलिकडेच मान्सूनपूर्व पावसामुळे खोल खड्ड्यांनी भरलेला असून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी रस्ते इतके खराब आहेत की, वाहने चालवणे धोक्याचे ठरत आहे, अशी माहिती स्थानिक कार्यकर्त्यांनी दिली.

साळगाव काँग्रेस ब्लॉक प्रमुख अतुल नाईक यांनी सांगितले की, स्थानिक आमदारांनी आश्वासन दिले होते की पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती होईल. मात्र प्रत्यक्षात काहीच झाले नाही. दररोज अपघात होत आहेत. गंभीर जखमी झाल्यास रुग्णवाहिकाही त्या रस्त्यावरून जाऊ शकणार नाही.

नाईक यांनी आणखी गंभीर आरोप करत म्हटले, साळगाव-पिळर्ण मार्ग फक्त तीन महिन्यांपूर्वीच दुरुस्त करण्यात आला होता. आता पुन्हा तो खोदण्यात आला आहे. हे सततचे खोदकाम केवळ नव्या निविदा काढून करदात्यांच्या पैशांचा अपव्यय करण्यासाठीच चालले आहे, असे दिसते.

निवेदनात म्हटले आहे की, हा रस्ता पर्यटन व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. परिसरातील बहुतांश रहिवासी पर्यटनावर अवलंबून आहेत - हॉटेल्स, गेस्टहाऊस, रेस्टॉरंट्स चालवतात. गोव्याच्या पर्यटन प्रतिमेला हा रस्ता धक्का पोचवत आहे.

त्याचबरोबर, म्हापसा ते बेती दरम्यान चालणाऱ्या बसेसना सांगोल्डा येथील चोगम मार्गावर वळवण्यात आले असून त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, असेही काँग्रेसच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काँग्रेसने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्काळ पावसाळ्यापूर्वी सर्व रस्त्यांची डागडुजी करण्याची मागणी केली असून अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

करंजाळे समुद्रकिनारा प्लास्टिक कचऱ्याने भरला !

कंत्राटदाराच्या प्रयत्नांनंतरही स्थिती गंभीर

प्लास्टिक कचऱ्यात गोवा देशात प्रथम

■ उपेंद्र नाईक /टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : पावसाळ्याच्या तोंडावर करंजाळे समुद्रकिनाऱ्यावर प्लास्टिक कचऱ्याचा साचलेला खच पुन्हा एकदा दिसून आला आहे. गोवा पर्यटन विभागाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या इकोस्टन इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदाराने साफसफाईचे प्रयत्न सुरू ठेवले असतानाही किनाऱ्याची अवस्था चिंताजनक आहे.

गेल्या पंधरवड्यात कंत्राटदाराने सुमारे ७०० ते ८०० टन कचरा गोळा केला असूनही, समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक आणि इतर न विघटनशील वस्तूंचा साठा वाढतच आहे. स्थानिकांच्या मते, ही समस्या वर्षानुवर्षे सुरू आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला समुद्रातून वाहून आलेला टनभर कचरा किनाऱ्यावर जमा होतो आणि पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी ही बाब त्रासदायक ठरते.

प्रत्येक वर्षी हीच समस्या उद्भवत असूनही, दीर्घकालीन उपाययोजना अद्यापही राबवण्यात आल्या नसल्याचे स्पष्ट होते. केवळ हंगामी साफसफाईवर भर दिला जातो ; मात्र प्लास्टिकचा साठा टाळण्यासाठी मूलभूत उपाययोजना, जसे की कचऱ्याचे स्रोतावर नियंत्रण, किनारी भागात प्लास्टिकवर निर्बंध, स्थानिक सहकार्याची यंत्रणा आदी बाबी अद्यापही प्रभावीपणे अंमलात आलेल्या नाहीत.

पर्यावरणप्रेमींनी आणि स्थानिकांनी वारंवार ही समस्या अधोरेखित करूनही, प्रशासन किंवा पर्यटन खात्याकडून वर्षभरासाठी ठोस कृती आराखडा सादर करण्यात आलेला नाही. यामुळे पर्यावरणीय हानीसोबतच राज्याच्या पर्यटन प्रतिमेलाही तडा जाण्याची शक्यता आहे. पान २ ▶

तोपर्यंत गोवा प्लास्टिक मुक्त होणार नाही - खा. तानावडे

जोपर्यंत आपण स्वत: आपल्या घरातले प्लास्टीक काढून रस्त्यावर फेकणे बंद करीत नाही तोपर्यंत गोवा प्लास्टीक मुक्त होणार नाही असे राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे यांनी म्हटले आहे. पर्यावरण विभागातर्फे आयोजीत जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रमात ते बोलत होते. गोवा प्लास्टीक मुक्त करणे हे आपल्याच हातात असून आपण सर्वांनी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवणे गरजेचे आहे असे ते म्हणाले